# फ्लिपकार्ट आणि महाराष्ट्र सरकार यांच्यातील सांमजस्य कराराने राज्यातील छोटे उद्योग आणि स्थानिक कारागिरांच्या विकासाला मिळणार चालना

- *फ्लिपकार्ट समर्थ उपक्रमाअंतर्गत सामंजस्य करारावर सह्या*
- *महाराष्ट्रात एमएसएसआयडीसी आणि एमएसकेव्हीआयबीच्या* सामंजस्य करारामुळे *राज्यातील स्थानिक कारागीर, विणकर आणि छोट्या उद्योगांना आपली वैशिष्ट्यपूर्ण उत्पादने देशातील लाखो ग्राहकांसमोर आणता येतील*

**मुंबई - ११ फेब्रुवारी २०२१ :** फ्लिपकार्ट या भारतातील अंतरदेशीय ई-कॉमर्स बाजारपेठेने **महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित** (एमएसएसआयडीसी) आणि **महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ** (एमएसकेव्हीआयबी) यांच्यासह सामंजस्य करार करून राज्यातील स्थानिक कारागीर, विणकर, हस्तकलाकार आणि एमएसएमईना ई-कॉमर्सच्या विश्वात आणले आहे. *फ्लिपकार्ट समर्थ* या कंपनीच्या प्रमुख उपक्रमात स्थानिक कारागीर आणि त्यांच्या उपक्रमांचा समावेश करण्यासाठीच्या या सामंजस्य करारावर माननीय श्री. सुभाष देसाई, मंत्री उद्योग आणि खनिकर्म आणि माननीय श्रीमती. अदिती तटकरे, राज्यमंत्री उद्योग आणि खनिकर्म यांच्या उपस्थितीत सह्या करण्यात आल्या.

*फ्लिपकार्ट समर्थ* उपक्रमाअंतर्गत झालेल्या या सामंजस्य करारामुळे महाराष्ट्रातील स्थानिक कारागीर, विणकर, हस्तकलाकार आणि छोट्या उद्योगांना खादी, पैठणी साड्या, लाकडाची खेळणी, हाताने बनवलेल्या वस्तू, दागिने, कागदी वस्तू, पर्स आणि हस्तकलेच्या इतर वैशिष्ट्यपूर्ण वस्तू देशातील लाखो ग्राहकांसमोर मांडता येतील. शिवाय यातून सरकारच्या "**Vocal for Local**" या उद्देशालाही बळकटी मिळणार आहे. *फ्लिपकार्ट समर्थ* हा राष्ट्रीय पातळीवरील उपक्रम आहे. कुशल स्थानिक कारागीर समुदायाला फ्लिपकार्ट मार्केटप्लेसवर परिणामकारक, पारदर्शक आणि योग्य मूल्यासहित व्यवसायास बळकटी आणण्यासाठी या उपक्रमातून साह्य केले जाईल.

सुरुवात करण्यासाठी योग्य वेळेतील पाठबळ देत हा उपक्रम स्थानिक कारागीरांपुढील सुरुवातीच्या टप्प्यातील अडथळे दूर करतो. यात सहजपणे ऑनबोर्डिंग, मोफत कॅटलॉग तयार करणे, विपणन, अकाऊंट व्यवस्थापन, व्यवसायासंबंधी माहिती आणि गोदामाची सुविधा अशा लाभांचा समावेश आहे. यामुळे समाजातील या अत्यंत महत्त्वाच्या समुदायासाठी व्यवसायवृद्धी आणि उद्योग समावेशकतेच्या संधी निर्माण होतात.

स्थानिक कारागीर आणि हस्तकला कारागीरांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांच्यातील उद्योग समावेशकता वाढवण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र सरकार राज्य पातळीवर अनेक उपक्रम राबवत आहे. राज्य सरकारने एमएसएसआयडीसी आणि एमएसकेव्हीआयबीची स्थापना करून महाराष्ट्रातील लघु उद्योगांना विकासासाठी नवे बळ आणि दृष्टिकोन दिलेला आहे. महाराष्ट्रातील पारंपरिक ग्रामोद्योग, उत्पादने आणि

हस्तकलेच्या वस्तूंचा उद्योग पुनरुज्जीवित करणे, त्यांचा विकास आणि प्रगती यासाठी ग्रामीण भागातील कारागीरांच्या विविध गरजांकडे लक्ष दिले जात आहे, तसेच त्यांची उत्पादने भारतात आणि परदेशात वितरित केली जात आहेत.

**माननीय श्री. सुभाष देसाई, मंत्री उद्योग आणि खनिकर्म, महाराष्ट्र राज्य म्हणाले**, "*राज्याच्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यात आणि राज्याच्या सामाजिक-आर्थिक विकासात एसएसएमई क्षेत्राचा मोठा वाटा आहे. कोविड-१९ नंतरच्या काळात आम्ही हस्तकला आणि हातमाग उद्योगाला सक्षम करण्यासाठी आणि त्यांना अधिक चांगल्या बाजारपेठेच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी या सामंजस्य करारादवारे क्रांतीकारी पावले उचललेली आहेत.*"

**माननीय श्रीमती. अदिती तटकरे, राज्यमत्री उद्योग आणि खनिकर्म, महाराष्ट्र राज्य म्हणाल्या**, "*अशा प्रकारच्या सामंजस्य करारामुळे खादी आणि ग्रामोद्योग, हस्तकला आणि हातमाग उद्योग क्षेत्राच्या वाढीला चालना मिळेल आणि त्यातून रोजगाराच्या संधी निर्माण होतील.*"

**फ्लिपकार्ट समूहाचे चीफ कॉर्पोरेट अफेअर्स ऑफिसर श्री. रजनीश कुमार** म्हणाले, "*एमएसएसआयडीसी आणि एमएसकेव्हीआयबीसोबत भागीदारी करून स्थानिक कारागीर, विणकर आणि लघु उद्योगांचा सामाजिक आणि व्यावसायिक विकास साधत या व्यासपीठावर राज्याचा संपन्न वारसा मांडण्याची ही संधी मिळाल्याबद्दल आम्ही उत्सुक आहोत. आमच्या व्यासपीठावर खरेदी करणाऱ्या ३०० दशलक्ष ग्राहकांची राष्ट्रीय बाजारपेठ देशभरातील एमएसएमईना उपलब्ध करून देण्यात ई-कॉमर्स फार महत्वाची भूमिका बजावते. फ्लिपकार्ट समर्थ हा एक महत्वाचा उपक्रम आहे. यात व्यवसायांना आवश्यक पाठबळ मिळते आणि अशा अधिकाधिक स्थानिक व्यवसायांना ई-कामर्सचे लाभ मिळवून देण्यासाठी त्यांच्यापर्यंत आम्ही पोहोचू अशी आम्हाला आशा आहे.*"

**माननीय श्री. बलदेव सिंह, भा.प्र.से, प्रधान सचिव. उद्योग विभाग, महाराष्ट्र राज्य** म्हणाले, "*आपल्या हस्तकला व्यावसायांना व कारागिरांना मौल्यवान, व्यावसायिक ज्ञान मिळेल आणि त्यांची वैशिष्ट्यपूर्ण उत्पादने भारतभरात पोहोचतील, अशी आशा या सामंजय्य करारादवारे आहे.*"

**मा.डॉ. एम. नीलिमा केरकेटा,भा.प्र.से, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ (एमएसकेव्हीआयबी)** म्हणाल्या, "*ग्रामोद्योग क्षेत्रातील उत्पादनांच्या विपणनासाठी हे व्यासपीठ एक परिणामकारक साधन आहे. यातून ग्रामीण लघु उद्योजकांना अधिक अत्याधुनिक व आधुनिक पद्धतीने रोजगार मिळवण्यासाठी प्रोत्साहन मिळेल.*"

**मा.श्री. प्रविण दराडे, भा.प्र.से, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित (एमएसएसआयडीसी)** म्हणाले, "*या उपक्रमातून स्थानिक कारागीरांना सुरुवातीच्या टप्प्यात जाणवणाऱ्या अडचणी दूर होतील आणि यातून दीर्घकालीन रोजगार मिळेलच. त्यासोबतच कारागीरांना*

*आपल्याकडील पिढयानुपिढया  असलेली स्थानिक कला आणि कारागीरीची कौशल्ये  नव्या पिढीपर्यंत पोहोचवता येतील.”*

*फ्लिपकार्ट समर्थ* उपक्रमाची सुरुवात २०१९ मध्ये करण्यात आली. वंचित, स्थानिक समुदाय आणि व्यवसायांना अधिक प्रमाणातील संधी आणि अधिक चांगल्या रोजगाराच्या संधी देऊ करण्यासाठी हे शाश्वत आणि सर्वसमावेशक व्यासपीठ निर्माण करण्यात आले आहे. फ्लिपकार्ट समर्थ सध्या भारतभरातील ७,५०,००० हून अधिक कारागीर, विणकर आणि हस्तकला कारागीयांच्या रोजगाराला पाठबळ देत आहे आणि अशा अधिक विक्रेत्यांना या व्यासपीठावर आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. फ्लिपकार्टने नुकत्याच केलेल्या घोषणेनुसार ग्राहकांसाठी या व्यासपीठावर मराठी इंटरफेस उपलब्ध असल्याने राज्यातील ग्राहकांच्या अधिक निकट पोहोचता येणार आहे.

**About the Flipkart Group**

The Flipkart Group is one of India's leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, and Flipkart Wholesale. Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants, and small businesses to be a part of India's e-commerce revolution, with a registered customer base of over 300 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratize e-commerce in India, drive access and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem and empower generations of entrepreneurs and MSMEs have inspired us to innovate on many industry firsts. The recent launch of Flipkart Wholesale, our new digital marketplace, is a testament to our commitment to accelerate the growth of kiranas and MSMEs in India. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns – customer-centric innovations that have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with Myntra, which holds a prominent position in the online fashion market, and now Flipkart Wholesale, the Flipkart Group will continue to steer the transformation of commerce in India through technology.

**For more information, please contact** **media@flipkart.com**/MSSIDC/MSKVIB